**विषय - पत्रकार नगर संस्थेच्या पुनर्निर्माण प्रकल्पाची आतापर्यंतची वाटचाल आणि पुढील कामाचे स्वरूप.**

पुणे पत्रकार सहकारी गृहरचना संस्था (मर्यादित)

पत्रकार नगरच्या सभासद बंधू-भगिनींनो,

पत्रकार नगर पुनर्निर्माण, हा विषय आता चांगलाच वेग घेत आहे. यासंदर्भात आपणां सर्वांबरोबर चर्चा करण्यासाठी एका अनौपचारिक मेळाव्याचे आयोजन शनिवारी, ता. 14 जानेवारी रोजी करण्यात आले आहे. संस्थेच्या मधुकर जोशी सभागृहात संध्याकाळी सहा वाजता हा मेळावा होईल.

आपल्या सर्वांसाठी हा एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. आपण सारेच या ऐतिहासिक घटनेचे लवकरच साक्षीदार होणार आहोत. आपल्या सर्वांच्या प्रतिसादाने हा प्रकल्प वेगाने पुढे जात आहे. आपण आतापर्यंत किती प्रगती केली, अजून किती पल्ला आपल्याला गाठायचा आहे अशा अनेक मुद्यांवर आपणां सर्वांशी मनमोकळी चर्चा करण्यासाठी या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. त्यासाठी आपली सहकुटुंब उपस्थिती अगत्याची आहे, यासाठीच हे निमंत्रण. नक्की या..

**तिळगूळ घ्या, गोड बोला!**

**पंचसमिती**